# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676

**Date - 27/ 05/2022**

## अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/०५/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ५,७२०/– रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

## दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक २६/०५/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अतंर्गत एकुण ०९ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ५५.६२ लिटर दारू असा एकुण १,३३,४४४/–रू कि.अं ची अवैध दारूचा साठा व एक मोसा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन  त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.